# दि.१८/०६/२०२१ रोजी झालेल्या नियमित आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे

**सभेस हजर सन्माननिय सदस्य**

०१) श्री रविंद्र सुर्यभान पाटील- मा.सभापती
०२) श्री अमित महेश देशमुख- सदस्य
०३) सौ विद्या दिलीप खोडपे- सदस्या
०४)सौ सुनिता विलास पाटील- सदस्या
०५) सौ सविता अतुल भालेराव- सदस्या
०६) श्री.नंदलाल शातांराम पाटील - सदस्य
०७) प्रा.डॉ.निलम शशिकांत पाटील- सदस्या
०८) श्री पद्मसिंग रामदास पाटील- सदस्य
०९) श्री.वसंत हिराचंद गायकवाड - सदस्य

**सभेस हजर अधिकारी व कर्मचारी**

१०)जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जळगांव ( प्रभारी )
११)अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.जळगांव
१२)माता बाल संगोपन अधिकारी
१३) जिल्हा सहसंचालक, कुष्ठरोग, जळगांव
१४) जिल्हा साथरोग अधिकारी, जळगांव
१५) जिल्हा क्षयरोग अधिकारी,जळगांव
१६) जिल्हा हिवताप अधिकारी, जळगांव
१७) कक्ष अधिकारी, आरोग्य विभाग, जि.प.जळगांव
१८) कार्यालयीन अधिक्षक १ व २
१९) सहा.लेखाधिकारी, आरोग्य विभाग, जि.प.जळगांव
२०) उपअभियंता एन. एच. एम.आरोग्य विभाग, जि.प.जळगांव
२१) औषध निर्माण अधिकारी, जिल्हा औषधी भांडार जळगांव.
२२) शाखा अभियता, बांधकाम विभाग जि.प.जळगांव.

सदरची सभा ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आली.येणेप्रमाणे सभेचे कोरम पुर्ण झाले त्यानंतर म.जि.आ.अ. रजेवर असल्याने आजच्या सभेचे कामकाज डॉ.श्री.पांढरे यांनी प्रभारी सचिव म्हणुन कामकाज पहावे.असे सर्व उपस्थीत सदस्यांनी सर्वानमुते ठरले. मा.सभापती सो आरोग्य समिती जि.प.जळगांव यांचे पुर्व परवानगीने आजच्या नियमित मासिक सभेस सुरूवात करण्यात आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

- दि.१८/०५/२०२१ रोजीच्या आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त म.सचिव यांनी वाचुन कायम करण्यात आले. त्याची सर्वानुमते नोंद घेतली.

**विषय क्र.२- मागील सभेत मंजुर ठरावातील पुर्ततेचा आढावा घेणे**

- मागील सभेत झालेल्या ठराव पुर्ततेचा आढावा घेण्यात आला.
- बोगस सॅनिटाईझर बाबत म. सदस्य अमित देशमुख यांनी विचारले असता बोगस सॅनिटाईझर आले त्याचे सॅपल आहे काय तसेच जुने नवीन त्याच कपंनीचे सॅनीटाईझरचे सॅपल चेक केले आहे काय त्याची खरेदी कोणी केली याबाबत खुलासा करावा. आजच्या सभेचे कामकाजाचे म.सचिव डॉ.पांढरे यांनी याबाबत श्री.रविंद्र पाटील औषध भाडांर यांनी याबाबत खुलासा करावा असे सांगितले.याबाबत श्री.पाटील औषध भाडांर यांनी याबाबत खुलासा केला की, सॅनिटाईझर सॅपल नाही आहे,नवीन सॅनीटाईझरचे सॅपल चेक केले आहे,त्याची खरेदी औषध भाडांर कडुन फाइल्स प्रस्तावीत होते,त्यास म.जि.आ.अ. याचे मार्फत म.मुख्यकार्यकारी अधिकारी याचेंकडे मान्यतेस सादर केली जात असते.
- . म.सभापती यांनी सदर बाबत प्रथम क्वॅालीटी कंटोल कडुन तपासूणच वाटप करणेत यावे असे सुचना दिल्यात.

म.सदस्य अमित देशमुख यांनी सॅनिटाईझर खरेदीची जबाबदारी कोणाची आहे.याला जबाबदार कोण त्याच्यांवर कार्यवाही करावी.त्यांचा प्रस्ताव म.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे ज्याचांकडे आजच्या सभेचे पदभार आहे त्यांनी पाठवावा.

म. सदस्य अमित देशमुख यांनी आरोग्य विभागातील आरोग्य सेवकाचा बदलीचा विषय स्थायी सभेत घेण्यात आला त्या बाबत काय झाले त्याबाबत डॉ. पांढरे यांनी सागितले की, सदर आरोग्य सेवकाची बदली बाबतची सामान्य प्रशासन विभागाकडे फाईल पाठवली त्यात पुर्तता करणे कामी फाईल परत आरोग्य विभागाकडे आली आहे.त्यातील पुर्ततानुसार फेर फाईल सादर करता येईल.

- तसेच सन्मा.सदस्य यांनी सांगितले की, आरोग्य एनआरएचएम विभागात ज्यानां पाच वर्षोपेक्षा जास्त कालावधी झाले आहेत असे एनआरएचएमचे अधिकारी कर्मचारीसह इतरत्र पदस्थापना देण्यात यावे असी चर्चा झाली.

**विषय क्र.३- आरोग्य विभागाकडील कामांचा आढावा घेणे, कुटुंबकल्याण, साथरोग, शालेय आरोग्य, माता बाल संगोपन, कुष्ठरोग, क्षयरोग, हिवताप, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचा आढावा घेणे.**

- कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेच्या माहे मे २०२१ अखेर २२५०० वार्षिक उद्दीष्ट पैकी६८ केसेस करण्यात आल्या आहेत. कॉपर्टीचे वार्षिक उद्दिष्ट १६५१२ असून मे २०२१ अखेर १७२३ सदर कोव्हिड १९ साथीचा प्रार्दुभाव असल्याने काम कमी होत आहे.या बाबत डॉ.समाधान वाघ जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी यांनी आढावा दिला.
- जिल्हा हिवताप अधिकारी यांनी सांगितले की मे २०२१ अखेर ५३७४८६ ओपीडीपैकी २५३५६ रक्त नमुने घेण्यात आलेले असुन माहे मे २०२१ पासुन दुषित रक्तनमुने निरंक आलेले आहे.
- क्षयरोगाचे मे २०२१ अखेर एकुण ३८०५२ नवीन बाहय रुग्ण असुन २०१७० थुंकी नमुने घेण्यात आलेत.त्यापैकी ६२ दुषित थुंकी नमुने आलेले आहे.व अदुषित थुंकीनमुने ६१,पुर्वउपचार रुग्ण ०९ इतर अवांतर क्ष रुग्ण २४ असे एकूण १५६ रूग्णांवर औषधोपचार व एमडीआर रुग्ण ०१ आलेले असुन त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे क्षयरोग अधिकारी यांनी सांगितले.माहे मे २०२१ अखेर कुष्ठरोगाचे नवीन १७ रूग्ण शोधण्यात आले. उपचार ३७९ सुरू असल्याचे डॉ.तडवी यांनी सांगितले .उवरीत रोग मुक्त आहेत.
- वरील प्रमाणे आढावा संबंधीत अधिकारी यांनी सभेत वाचुन दाखविला. त्याची सर्व सन्मा. सदस्यांनी नोंद घेतली.

**विषय क्र.४- महत्वाचे शासकिय परिपत्रकाचे वाचन व अहवाल सादर करणे.**

- परिपत्रक वाचण करण्यात आले.

**विषय क्र.५- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास ते मंजुर करणे.**

मा. सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत.

सर्व

**विषय क्र.६- प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकामाचा/दुरूस्तीचा आढावा घेणे.**

श्री बाविस्करशाखा अभियंता यांनी **प्रा.आ.केंद्र/उपकेंद्रबांधकामाचा/दुरूस्तीचा आढावा घेण्यात** आला

**विषय क्रं. ७ - मौजे वर्डी ता.चोपडा व मौजे चांदसणी ता.चोपडा येथील उपकेद्रं निलर्खन करुन नविन इमारतीचे बाधंकामास मंजुरी मिळणे बाबत...**

**ठराव क्र.७/६४ मौजे वर्डी ता.चोपडा व मौजे चांदसणी ता.चोपडा येथील उपकेद्रं जिर्ण झाल्याने निलर्खन करुन नविन इमारतीचे बाधंकामास मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..**

**सुचक- सन्मा.सदस्या** - सौ.सविता अतुल भालेराव

**अनुमोदक- सन्मा.सदस्य श्री**.नंदलाल शातांराम पाटील

**विषय क्र.८ प्रा.आ.केंद्र गारेगावले बु. ता.चोपडा येथिल संरक्षणभिंत दुरस्त तसेच मुख्य ईमारत,कर्मचारीचे निवासस्थाने आवश्यक दुरस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत..**

**ठराव क्र.८/६५ प्रा.आ.केंद्र गारेगावले बु.ता.चोपडा येथिल संरक्षणभिंत दुरस्त तसेच मुख्य ईमारत,कर्मचारीचे निवासस्थाने आवश्यक दुरस्ती करणेस मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..**

**सुचक- सन्मा.सदस्य श्री** अमित महेश देशमुख

**अनुमोदक-सन्मा.सदस्य श्री**.वसंत हिराचंद गायकवाड

- **विषय क्र.९ मा.सभापती सो. आरोग्य समिती यांचे पुर्व परवानगीने घेण्याऱ्या आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय क्र. ९/१ प्रा.आ.केंद्र निभोरां बु. ता.रावेर येथिल कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीन बाधंकाम करणेस मंजुरी मिळणेबाबत..**

**ठराव क्र.९/६६ प्रा.आ.केंद्र निभोरां बु.ता.रावेर येथिल कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीन बांधकामास मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..**

**सुचक- सन्मा.सदस्या -सौ. सुनिता विलास पाटील**

**अनुमोदक सन्मा.सदस्या** - सौ.सविता अतुल भालेराव

**विषय क्र.९/२ प्रा.आ.केंद्र नशिराबाद ता.जळगावं येथिल वैदयकीय अधिकारी व कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीन बाधंकामास करणेस मंजुरी मिळणेबाबत..**

**ठराव क्र.९/६७ प्रा.आ.केंद्र नशिराबाद ता.जळगावं येथिल वैदयकीय अधिकारी व कर्मचारीच निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीनबाधंकामास मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..**

**सुचक- सन्मा.सदस्य श्री**.नंदलाल शातांराम पाटील

**अनुमोदक-सन्मा.सदस्य श्री**.वसंत हिराचंद गायकवाड

विषय क्र. ९/३ प्रा.आ.केंद्र रिगणगावं ता.एरंडोल येथिल वैदयकीय अधिकारी व कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन बाधंकाम करणेस मंजुरी मिळणेबाबत..

ठराव क्र.९/६८ प्रा.आ.केंद्र रिगणगावं ता.एरंडोल येथिल वैदयकीय अधिकारी व कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन बांधकाम करणेस मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

सुचक -सन्मा.सदस्या--सौ.सविता अतुल भालेराव
अनुमोदक- सन्मा.सदस्य श्री.पदमसिंग रामदास पाटील

विषय क्र.९/४ प्रा.आ.केंद्र थोरगव्हाण ता.रावेर येथिल मुख्य ईमारत,कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने दुरस्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत..

ठराव क्र.९/६९ प्रा.आ.केंद्र थोरगव्हाण ता.रावेर येथिल मुख्य ईमारत,कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन बांधकामास मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..

सुचक- सन्मा.सदस्य श्री.नंदलाल शातांराम पाटील
अनुमोदक- सन्मा.सदस्या - सौ विद्या दिलीप खोडपे

विषय क्र.९/५ प्रा.आ.केंद्र साळवा ता.धरणगावं येथिल मुख्य ईमारत व अधिकारी कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीन बाधंकामास मंजुरी मिळणेबाबत..

ठराव क्र.९/७० प्रा.आ.केंद्र साळवा ता.धरणगावं येथिल मुख्य ईमारत व अधिकारी, कर्मचारीचे निवासस्थाने जिर्ण झाले असल्याने निर्लखन करुन नवीनबांधकामास मंजुरी बाबतचा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला..

सुचक- सन्मा.सदस्या -सौ. सुनिता विलास पाटील
अनुमोदक- सन्मा.सदस्या प्रा.डॉ.निलम शशिकांत पाटील

**सर्व साधारण चर्चा –**

म. सदस्य अमित देशमुख यांनी सभेत तालुका आरोग्य अधिकारी रावेर डॉ.शिवराय पाटील यांचे काम चागंले आहे. त्याचां तालुका आरोग्य अधिकारी पदाचा चार्ज काढण्यात येवू नये .असे चर्चेत सर्वोनमुते ठरले.

**तसेच** म. सदस्य अमित देशमुख यांनी सभेत सर्व साधारण चर्चेवेळी पावसाळयाच्या परिस्थी लक्षात घेता औषधी मोठया प्रमाणावर उपलब्ध करुण घेण्यात यावे.असे सुचना देण्यात आल्या.

त्याच प्रमाणे म.सभापती यांनी किनगावं ,सावखेडेसिम येथे नवीन ॲम्बुल्नस देणे बाबत चर्चेत सर्वोनमुते ठरले.

म.सभापती यानी रावेर तालुक्यात मध्यप्रदेश हददीत प्रवेश करण्यासाठी ॲन्टी टेस्ट करावी लागते त्यासाठी जनतेकडुन ५०-५०रुपये जमा करण्यात येतात याबाबत संबधिताकडुन खुलासा मागवावा .तसेच

साथरोग विषयी सर्व ग्रामपंचायत यानां पाईपलाइन फुटलेली,व्हॉललिकीज होणार नाहीत तसेच दैनदीन पाणी शुध्दीकरण्यात यावे त्याप्रमाणे टिसीएल साठा वेळोवळी ठेवणे बाबत लेखी पत्र देण्यात यावे. त्याच प्रमाणे तालुका आरोग्य अधिकारी व प्रा.आ.केद्रं येथील रुगण समिति बोर्डावर पूर्वीच्या कार्यकाळातील नाव आहेत अजून सध्याच्या कार्याकालातील मा.सभापती याचे बोर्डावर नाव नाहीत रुगण समिती चे बोर्डे नाहीत असे म.सभापती यांनी बोर्डावर नाव लिहणे तसेच रुगण समिती चे बोर्डे लावणे सर्व ता.आ.अ.यानां सुचना दिल्यात.

वरील प्रमाणे आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

येणेप्रमाणे म.सभापती यांचे पुर्वपरवानगीने म.सचिव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व सभा संपल्याचे जाहिर केले.

| | |
|---|---|
| सचिव तथा,<br>जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद जळगांव | सभापती<br>आरोग्य समिती<br>जिल्हा परिषद जळगांव |